महाराष्ट्र शासन

सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, नाशिक

सार्वजनिक बांधकाम मंडळ, अहमदनगर

# नागरिकांची सनद

## CiTiZENS' CHARTER

२०१७

# सूची


| अ.क्र. | तपशील |
|---|---|
| १. | प्रस्तावना |
| २. | विभागाची बांधिलकी व नागरिकांची जबाबदारी |
| ३. | विभागाची रचना |
| ४. | कार्यपुर्तीचे वेळापत्रक, माहितीची सुलभता |
| ५. | खाजगीकरण व वाहतूकीस सुरक्षित रस्ते |
| ६. | गाऱ्हाण्यांचे निराकरण, सनदेचा आढावा व जनसामान्यांची छाननी |
| ७. | सनदेची अंमलबजावणी |
| ८. | परिशिष्टे अ व ब |

## १. प्रस्तावना

महाराष्ट्र शासनाचा सार्वजनिक बांधकाम विभाग हा सुमारे १५० वर्षाहून जास्त अशी गौरवशाली परंपरा असलेला महत्वाचा विभाग आहे. हा विभाग नागरीकांना खालील सुविधा पुरविण्यास बांधील आहे. ही बांधीलकी सार्वजनिक बांधकाम मंडळ, अहमदनगर या सनदेद्वारे जाहीर करीत असून, ती स्विकारीत आहे. सार्वजनिक सेवा तत्परतेने, सौजन्यपूर्वक व सन्मानपूर्वक वागणूक मिळून उपलब्ध व्हाव्यात व नागरिकांचे सामायिक प्रश्न सहानुभुतीपूर्वक सोडवावेत हा दृष्टीकोन ही सनद तयार करतांना नजरेसमोर ठेवला आहे.

१. शासकिय इमारतींची (कार्यालयीन तसेच निवासी गाळे) नवीन बांधकामे उत्तम गुणवत्तेची, टिकाऊ, सुरक्षित, अत्यावश्यक सुविधायुक्त, सौंदर्यपूर्ण व सभोवतालचा परिसर सुशोभित करणारी अशी करणे.

२. इमारती, रस्ते व पुलांची नियतकालीक देखभाल व दुरुस्ती उपलब्ध होणाऱ्या निधीतून प्रभावीपणे करणे व सेवा सुविधांचा स्तर उंचावत नेणे.

३. इतर सर्व संबंधीत विभागांना तांत्रिक सल्ला देणे.

४. सार्वजनिक ठिकाणी वापरावयाचे मंडळ, स्टेज इ.बाबतीत सुरक्षिततेच्या दृष्टीने तपासणी करुन प्रमाणित करणे.

५. अपात्कालिन व्यवस्थेसाठी तत्परतेने स्थापत्य अभियांत्रिकीशी संबंधीत आवश्यक ती कामे करणे व मदत करणे.

६. सर्व कार्यालयांत प्रतिसाद वेळापत्रक प्रदर्शित करणे.

७. ठेकेदारांची नोंदणी प्रमाणपत्रे व विविध ना-हरकतीचे दाखले विहीत कालावधीत निर्गमित करणे.

८. सर्व कार्यालयातून कर्मचारी वर्गाची कर्तव्ये व जबाबदऱ्या फलकावर जाहीररित्या प्रदर्शित करणे.

९. प्रत्येक कार्यालयात ठरवून दिलेल्या दिवशी व वेळी सर्वसामान्य जनतेची गाऱ्हाणी / तक्रारी ऐकणे व त्यांचे प्रभावीपणे निराकरण करणे.

१०. **"माहितीचा अधिकार अधिनियम"** अंतर्गत मागितलेली माहिती संबंधितांना विहित मुदतीत उपलब्ध करुन देणे.

११. विभागाच्या कामकाजात सातत्य ठेऊन व आधुनिकता आणून विभागाची लोकभिमुखता वाढविणे.

१२. नागरिकांच्या सनदेस व्यापक प्रसिध्दी देणे.

संगणकीकरणा बाबत सर्व विभागीय कार्यालये, मंडळ कार्यालये, प्रादेशिक कार्यालये, तसेच मंत्रालय यांना नेटवर्कने जोडून आवश्यक माहिती उपलब्ध होण्यासाठी प्रयत्नशील राहणे. **विभागाची विविध माहिती www.mahapwd.com** या वेबसाईटवर अद्यावत उपलब्ध करणे.

### (१) बांधिलकी

वरील सर्व कर्तव्ये पार पाडतांना सार्वजनिक बांधकाम मंडळ, अहमदनगर,

अ) सेवेच्या गुणवत्तेची बांधिलकी ठेवीन.

ब) सौजन्यपूर्ण व मदतीची वृत्ती ठेऊन कामाचा वेळेत निपटारा करेल.

क) पारदर्शकता व निष्ठा ठेवील.

यासाठी वेळोवेळी विविध परवानापत्रे / प्रमाणपत्रे मिळविण्यासाठी कार्यपध्दती, पत्रके नागरिकांच्या माहितीसाठी उपलब्ध करण्यात येतील.

**(२) नागरिकांची जबाबदारी**

- ❖ शासकिय अधिकारी / कर्मचारी यांचेशी नागरिकांची वर्तणूक सौजन्यपूर्वक असावी.
- ❖ नागरिकांकडून आवश्यक असलेली माहिती व कागदपत्रे परिपूर्णरित्या मिळावी.
- ❖ नागरिकांचा प्रतिसाद विकासाला मदत करणारा असावा.
- ❖ विहित केलेल्या कालावधीपेक्षा कमी कालावधीत सेवा पुरविण्याचा आग्रह धरु नये.
- ❖ सार्वजनिक मालमत्तेची व्यवस्था पाहण्यास सहकार्य करावे.
- ❖ नागरिकांना स्वेच्छेने अतिक्रमणे दूर करावीत व पुन्हा सरकारी जागांवर अतिक्रमणे करु नयेत.
- ❖ रस्त्याच्या दोन्ही बाजूंना असणाऱ्या वृक्षराजाचे जतन ही नागरिकांची सुध्दा जबाबदारी राहिल.
- ❖ नागरिकांना कायदेशीर तरतुदी, नियम, अलिखित संकेत यांचे पालन करावे.

**(३) <u>सार्वजनिक बांधकाम विभागाची रचना</u>**

शासनस्तरावर मा.मंत्री (सार्वजनिक बांधकाम), मा.मंत्री सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम), तसेच मा.राज्यमंत्री (सार्वजनिक बांधकाम) यांचे अधिपत्याखाली विभागाचे दोन सचिव **( सचिव (रस्ते) व सचिव (बांधकामे) )** हे सर्वोच्च प्रशासनिक अधिकारी आहेत. शासनस्तरावर विविध धोरणात्मक निर्णय, विभागाचा अर्थसंकल्प, राष्ट्रीय महामार्ग / राज्य महामार्ग, इतर रस्ते, शासकिय इमारती यांचे बांधकाम, देखभाल / दुरुस्ती इत्यादी बाबी हाताळल्या जातात.

अहमदनगर जिल्ह्या करिता सार्वजनिक बांधकाम मंडळ, अहमदनगर हे कार्यालय असून, त्याचे मुख्य अधीक्षक अभियंता हे आहेत. ते मंडळांतर्गत कामांची अंमलबजावणी व प्रशासनिक नियंत्रण यास जबाबदार असतांत. त्यांचे अंतर्गत पाच कार्यकारी अभियंता कार्यरत असून, सार्वजनिक बांधकाम विभाग, अहमदनगर, सार्वजनिक बांधकाम विभाग, संगमनेर, सार्वजनिक बांधकाम रो.ह.यो.(कार्य) विभाग, अहमदनगर, जागतीक बँक प्रकल्प विभाग, अहमदनगर व मार्ग प्रकल्प विभाग क्र.-२, अहमदनगर अशी आहेत. विभागांतर्गत साधारण ६ ते ७ उपविभाग आहेत. (सोबत तक्ता परिशिष्ट- अ जोडण्यात आलेले आहे.) या शिवाय जिल्हा परिषदे कडील दोन कार्यकारी अभियंता असून त्यांची कार्यालये जि.प.(सा.बां.) उत्तर विभाग, अहमदनगर व जि.प.(सा.बां.) दक्षिण विभाग, अहमदनगर अशी आहेत.

प्रस्तावनेत नमूद केलेल्या सार्वजनिक सेवा सार्वजनिक बांधकाम विभाग पुरवित असतो. कामांच्या अंमलबजावणीसाठी सा.बां.नियमावली, लेखा संहिता, विनिर्देश, वेळोवेळी निर्गमित केलेले शासन निर्णय, परिपत्रके इ. चे काटेकोरपणे पालन क्षेत्रिय अधिकाऱ्यांकडून केले जाते.

**(४) (अ) <u>कार्यपूर्तीचे वेळापत्रक</u>**

ठेकेदारांची नोंदणी, विविध ना-हरकत प्रमाणपत्रे मिळण्यासाठी लागणारा कालावधी, त्यास सक्षम अधिकारी इत्यादिची माहिती कार्यपूर्तीचे वेळापत्रकात (परिशिष्ट- ब व क) नमूद केली आहे. अर्जाचा विहित नमुना व जोडावयाची आवश्यक कागदपत्रे याची माहिती विहित फी भरुन संबंधीत विभागीय कार्यालयात मिळू शकेल. नैसर्गिक आपत्ती, कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न इत्यादि उद्‌भवल्यास या वेळापत्रकातील कार्यपूर्तीच्या कालावधीत वाढ होऊ शकेल.

**(ब) माहितीची सुलभता**

विभागाच्या **www.mahapwd.com** या वेबसाईटवरुन (संकेतस्थळावरुन) तसेच वेळोवेळी प्रसिध्द केल्या जाणाऱ्या परिपत्रकाद्वारे जनतेला आकडेवारीचा तपशील सुलभतेने उपलब्ध होईल.

**(क) खाजगीकरण**

विशेषतः शहरी भागाच्या विकास कामासाठी अर्थसंकल्पातून उपलब्ध होणारा अल्प निधी व काळाची गरज, या कारणामुळे विभागाने विकास कामांमध्ये खाजगी क्षेत्रांचा सहभाग **बांधा, वापरा व हस्तांतरीत करा** या तत्वावर सुरु केला आहे. यामुळे ग्रामीण भागाकडे अधिक विकास निधी उपलब्ध करणे शक्य होणार आहे. कार्यक्रमाची परिणामकारकता, जनतेचे अभिप्राय इ. चा अभ्यांस करुन पुढील दिशा व धोरण ठरविले जाईल. खाजगीकरणांतर्गत मोठ्या कामांसाठी उदा. एकात्मिकृत रस्ते विकास कार्यक्रम इ. स्वरुपाची कामे सार्वजनिक बांधकाम विभाग व महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळा मार्फत करण्यात येतात.

**५. वाहतुकीस सुरक्षित रस्ते.**

विभागाने रस्त्यांची सुरक्षितता वाढविण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाने **अपघात निवारण समिती** स्थापन केली आहे. ही समिती प्रत्यक्ष पाहणी करुन रस्त्यांवरील अपघात प्रवण स्थळे शोधते व अशा स्थळांची सुधारणा करण्यासाठी उपाययोजना सुचविते.

समितीने सुचविलेल्या स्थळांची सुधारणा टप्प्याटप्प्याने हाती घेण्यात येते. तपशीलवार व आवश्यक असे माहितीफलक रस्त्यांवर लावले जातात जेणेकरुन रस्ते वाहतुकीस पादचाऱ्यांसह सर्वांना सर्वकाळ सुरक्षित राहतील.

**६. (अ) गाऱ्हाणी / तक्रारी यांचे निराकरण**

कार्यपूर्तीस होणारा विलंब वा अन्य काही गाऱ्हाणी विभागाबाबत अथवा काही कामाबाबत असतील तर, त्यासाठी नागरीकांनी ज्या विशिष्ट कार्यालयाविरुध्द गाऱ्हाणे / तक्रार असेल त्या कार्यालयाच्या वरीष्ठ कार्यालय प्रमुखाकडे तक्रार नोंदवावी म्हणजे उदा. उपविभाग कार्यालया विरुध्द गाऱ्हाणे / तक्रार असल्यास विभाग कार्यालय प्रमुखाकडे म्हणजे कार्यकारी अभियंता यांचेकडे गाऱ्हाणे मांडावे, विभाग कार्यालया विरुध्द तक्रार असल्यास मंडळ कार्यालयाच्या अधीक्षक अभियंत्याकडे गाऱ्हाणे / तक्रार मांडावे.

मंडळ कार्यालयाची तक्रार / गाऱ्हाणी असल्यास प्रादेशिक कार्यालयातील तक्रार निवारण अधिकाऱ्याकडे गाऱ्हाणे मांडावे. अशा गाऱ्हाणी / तक्रारीचे निराकरण वरीष्ठ कार्यालयाकडून ७ दिवसांत करण्यात येईल. गाऱ्हाणी / तक्रारी नोंदविण्यासाठी प्रत्येक कार्यालयात आवश्यक उपाययोजना करण्यात आलेली आहे.

गाऱ्हाणी समक्ष भेटीत / पत्राने वा ई-मेलद्वारेही नागरिक मांडू शकतात.

**(ब) नागरिकांच्या सनदेचा आढावा / सिंहावलोकन**

या नागरिकांच्या सनदेच्या उपयुक्तते बाबतचा तथा परिणामकारकतेचा आढावा सा.बां.विभागाकडून घेण्यात येईल.

**(क) जनसामान्यांकडून सुचना**

ही नागरीकांची सनद सर्वसामान्य नागरीकांच्या छाननीसाठी नेहमीच खुली असेल व सन्माननीय नागरीकांच्या बहुमुल्य सूचनांचा गांभिर्यपूर्वक विचार करुन, त्यात वेळोवेळी सुधारणा घडवून आणता यईल. ही नागरीकांची सनद स्वतःहून काही नवीन कायदेशीर हक्क निर्माण करीत नाही. ती ग्राहकांना म्हणजेच सा.बां.विभागाच्या सेवा उपभोगणाऱ्या नागरिकांना जादा हक्क मांडण्यासाठी मदत करते.

**७. नागरिकांच्या सनदेची अंमलबजावणी**

सार्वजनिक बांधकाम विभागाच्या या नागरिकांच्या सनदेची अंमलबजावणी करण्यास विभाग कटिबध्द आहे.

सनदेस व्यापक प्रसिध्दी देऊन, नागरिकांच्या प्रतिक्रिया / अभिप्राय मागविण्यात येतील व त्यांच्या सूचनांचा यथोचित आदर करुन आवश्यक बदल करण्यात येतील.

सार्वजनिक बांधकाम मंडळ, अहमदनगर खात्रीपूर्वक गुणवत्तेची सेवा पुरविण्याची हमी देत आहे. विभागाच्या कुठल्याही माहितीसाठी नागरिकांना संवेदनशील, सौजन्यपूर्ण व मदत करण्याच्या भावनेने वर्तणूक मिळेल. कार्यपध्दती अधिक लोकाभिमुख, सुलभ व आटोपशीर करण्यासाठी नागरिकांचा सल्ला घेतला जाईल. भ्रष्टाचारास आळा घालण्यात येईल. तसेच नागरिकांच्या गाऱ्हाण्यांचे कालबध्द निराकरण करण्यात येईल.

**परिशिष्ट अ**

**वृक्ष तक्ता (Tree Stucture)**


**मा.मंत्री (सा.बां.) मा.राज्यमंत्री सा.बां.**

**सचिव (रस्ते) सचिव (बांधकामे)**

**मुख्य अभियंता, सा.बां.प्रादेशिक विभाग, नाशिक**

**अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, अहमदनगर**

**कार्यकारी अभियंता, जागतिक बँक प्रकल्प विभाग अहमदनगर**



परिशिष्ट ब

कार्यपुर्तीचे वेळापत्रक

| अ. क्र. | कार्यसुची | कार्यवाही करणारा सक्षम अधिकारी | कार्यपूर्तीचा कालावधी मर्यादा |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १ | रस्त्याच्या कडेला असलेल्या इमारतीचा ना हरकत परवाना | कार्यकारी अभियंता | ३० दिवस |
| २ | पेट्रोलपंप आणि पेट्रोल पंपाच्या पोहोच मार्गाचे ना-हरकत प्रमाणपत्र | शासन | ६० दिवस |
| ३ | रस्ता ओलांडून जाणाऱ्या वाहिन्यांसाठी ना हरकत प्रमाणपत्र | मु.अ., राष्ट्रीय महामार्गासाठी व अ.अ. इतर मार्गासाठी | ३० दिवस |

**टिप :- सर्व वर्गांच्या नोंदणी व नुतनीकरण करण्यासाठी अर्ज कार्यकारी अभियंता यांचेकडे स्विकारण्यात येतात.**

"Approved"

(डी.डी. खैरनार)
कार्यकारी अभियंता
जागतिक बँक प्रकल्प विभाग
अहमदनगर